**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ (साक्षीदार) यांचा पुरावा** :–

मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : मारुती किशोर कोळपे,

वय : ५४ वर्षे, धंदा : नोकरी, पोलीस उपनिरीक्षक,

नेमणुक : भेलवंडी पोलीस स्टेशन, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. आर. धुमाळ यांच्यातर्फे–**

१. दिनांक १९/०५/२०१६ रोजी मी शहर पोलिस स्टेशन, श्रीरामपुर येथे कार्यरत होतो. सदर दिवशी मी पोलिस स्टेशन येथे हजर असताना पो.नि. पडवळ यांना नियंत्रण कक्ष, अहमदनगर यांच्याकडून बातमी मिळाली की, पशुकल्याण अधिकारी, पुणे शिवशंकर स्वामी यांनी कळविले की, बीप मार्केट, श्रीरामपुर येथील वॉर्ड क्र.२, श्रीरामपुर येथे १५ ते २० गोवंशीय जातीचे जनावर कत्तलीकरिता आणलेले आहे. अश्या माहितीवरुन पो.नि. पडवळ यांनी पी.एस.आय. सुधीर पाटील, दळवी, हेड कॉ. पवार, पो.ना. ठोंबरे, पो.कॉ. लांडे, पो.कॉ. साळवे व इतर असे आम्हाला बोलावून कळविले की, बीप मार्केट, वॉर्ड क्र.२, श्रीरामपुर येथे कार्यवाही करण्याकरिता जायचे आहे. त्यावरुन पी.एस.आय. दळवी यांनी दोन पंचांना व फोटोग्राफर यांना बोलावून घेतले. त्यानंतर आम्ही सर्व पोलिस कर्मचारी, पंच व फोटोग्राफर असे खाजगी व शासकीय वाहनाने सकाळी ०७.३० वाजताच्या दरम्यान पोलिस स्टेशन येथून निघालो व घटनास्थळी ०८.०५ वाजता पोहोचलो. पंचांसमक्ष आम्ही घटनास्थळी पत्र्याच्या शेडमध्ये, बीप मार्केट येथे प्रवेश केला. त्याठिकाणी एक जनावराचे मांस दिसून आले, तसेच जीवंत जर्शी गो–हे दिसून आले. त्याठिकाणी एकुण पाच लोक होते, त्यापैकी तिघांना ताब्यात घेतले. घटनास्थळी असलेल्या जनावराचे मांस पशुसंवर्धन अधिकारी, श्रीरामपुर यांनी सी.ए. परिक्षणाकरिता नमुना म्हणुन घेतले. त्यानंतर आरोपी यांना घेवून पोलिस स्टेशन येथे आलो. पी.एस.आय.सुधीर पाटील यांनी घटनेबाबत रितसर रिपोर्ट दिला. मी सदर कार्यवाहीमध्ये योग्यती मदत केली.

**साक्षीदाराचा उलटतपास आरोपी क्र. १ ते ३ करिता वकील श्री. टी. के. चौदंते यांचेतर्फे** :–

२. पोलिसांनी माझे बयान घटनेच्या दिवशी नोंदवून घेतले. घटनेच्या दिवशी मी पोलिस हवालदार म्हणून शहर पोलिस स्टेशन, श्रीरामपुर येथे कार्यरत होतो. पोलिस स्टेशन येथे नियमित सकाळी हजेरी होत असते. सदर दिवशी मी डयुटीवर हजर असल्याबाबत तपासी अधिकारी यांना कोणताही पुरावा दिला नाही. आम्ही पोलिस स्टेशन येथून घटनास्थळी गेलो व परत आलो त्याबाबत पोलिस स्टेशन डायरीला नोंद घेण्यात आली आहे. मी खाजगी

वाहनाने घटनास्थळी गेलो होतो. आम्ही ज्या सरकारी वाहनाने घटनास्थळी गेलो त्या गाडीवर दिवा लावलेला होता. पोलिस स्टेशन येथून घटनास्थळी पोहचायला २०–२५ मिनिटे इतका वेळ लागला. आम्ही पोलिस स्टेशन येथे परत १०.०० वाजताच्या दरम्यान आलो. घटनास्थळी माझ्यासमक्ष कोणतीही कार्यवाही लेखीस्वरुपात केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी हे खोटे सांगत आहे की, आम्ही घटनास्थळी गेलो व त्याठिकाणी आम्हाला जनावराचे मांस मिळून आले व तेथून आरोपींना ताब्यात घेतले. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना घडलेली नसताना वरिष्ठांच्या सांगण्यावरुन आरोपींविरुदध खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ठिकाण : श्रीरामपुर.
दिनांक : १०/०२/२०२५.

**(जितेंद्र दु. जाधव)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, श्रीरामपुर.